४९३३
१२/३/१८
२२१.५
प्रविष्ठ
आवश्यक



जोडपत्र अ

नियम ३ पहा

प्रशासकीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळविण्यासाठी अर्जाचा नमुना

MBMC/MS/IWL/2018/216

नगरसचिव विभाग
स.प./न.प./ज.र./आ.क्र. 33
दिनांक : 12/03/18 २०१७-१८

प्रति,

जन माहिती अधिकारी

उपायुक्त (मुख्यालय) आस्थापना)
मिरा-भाईंदर महानगरपालिका,

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव : संपत तुळशिराम गायकवाड (मो. नं. : ९५९४२३८९४५)

२. पत्ता : दैनिक जनतेचा महानायक,
रुम नं. १२, तिसरा मजला, कमलकुंज अपार्टमेंट, रॉलेक्स
टिंबर मार्टच्या वर, घाटकोपर (प.), मुंबई ४०००८६

३. हवी असलेल्या माहितीचा तपशिल : मीरा-भाईंदर नगरपालिका परिषदेच्या ~~मा~~ ① मा. स्थायी समिती ठराव क्र. ५८५ दि. २८-४-१९९५ व ② मा. स्थायी समिती ठराव क्र. ६३०(११) दि. १५-८-१९९५ या ठरावांच्या छायांकीत प्रती मिळण्याबाबत.
(सोबत- दि-२०-८-१९९५च्या आदेशाची प्रत जोडत आहे.)

(एक) माहितीचा विषय : वरीलप्रमाणे

(दोन) ज्या कालावधी संबंधात माहिती : अर्जदिनांकापर्यंत
हवी असेल तो कालावधी

(तीन) माहिती टपाल द्वारा हवी आहे की व्यक्तिशः हवी आहे : व्यक्तिशः

(चार) अर्जदार दारिद्रय रेषेखाली आहे किंवा कसे ? : नाही

ठिकाण : मुंबई

दिनांक : ९-३-२०१८.

आपला,

६५

(२)

दुरध्वनी : ८१९ २८२८/८१९ २००५/८१९ २५०० /८१९ २५५१ (१३/५)

# मिरा-भाईंदर नगरपालिका परिषद

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA-BHAYANDAR MUNICIPAL COUNCIL

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) पीन कोड-४०१ १०१.

जा. क्र. नजा/आस्था/६३८/५६०८/९५-९६ दिनांक २०/९/९५

प्रति,

श्री• दिपक भास्कर खंबित,
केअर ऑफ १०३, फ्रान्सिस स्मृती,
माणिकपुर , वसई रोड - ४०१ २०२,
के• टी• विजन सिनेमा जवळ,

वाचा :- १) मा. स्थायी समिती ठराव क्र. ५८६
दि २८/४/९५

२) मा. स्थायी समिती ठराव क्र. ६३०(११)
दि १६/९/९५

विषय -: ठेका [मक्ता/कंत्राट] पध्दतीने कनिष्ठ अभियंता म्हणुन काम करणे बाबत•

संदर्भ -: आपला दि• २८-८-९५ चा अर्ज•

आपणांस वरील संदर्भित विषयांनुसार कळविण्यांत येते की, नगर पालिकेच्या बांधकाम विभागात "कनिष्ठ अभियंता" म्हणुन खालील अटीशर्तीवर ठेका [मक्ता/कंत्राट] पध्दतीने दररोज सकाळी ते संध्याकाळी ८ तास याप्रमाणे ३० दिवसाचे रु. २,५००.०० [अक्षरी रुपये दोन हजार पाचशे मात्र ] प्रमाणे ठेका मंजुर करण्यांत येत आहे•

१] दिनांक २०/९/९५ पासुनची तुमची नेमणुक ठेका [मक्ता/कंत्राट] पध्दतीने कनिष्ठ अभियंता म्हणुन करणेत येत आहे•

२] नगर पालिकेच्या वरीष्ठ अधिका-यांकडुन दिल्या जाणा-या सुचना प्रमाणे काम करावे लागेल•

३] कनिष्ठ अभियंता म्हणुन काम करताना नगर पालिकेच्या हितास बाधा येईल असे कोणतेही कृत्य करु नये• कामास हयगय केल्यास तुम्हास सर्वस्वी जबाबदार धरण्येत येईल•

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती
जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती
जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

प•••••२/-

दूरध्वनी : ८१९ २८ २८/८१९ २० ०५/८१९ १४ ००/८१९ २५ ५१

# मिरा-भाईंदर नगरपालिका परिषद

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA-BHAYANDAR MUNICIPAL COUNCIL

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) पीन कोड-४०१ १०१.

जा. नं. ________ दिनांक ________

:::: २ :::::

५] तुम्हांस दिलेली नेमणूक कंत्राटी पध्दतीने व हंगामी कालावधीकरीता असुन या नेमणुकीचा नगर पालिकेच्या सेवेमध्ये कुठलेही फायदे अथवा हक्क तुम्हांस मिळणार नाही.

वरील अटीशर्तीचे पालन न केल्यास तुमचा ठेका रद्द करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

मुख्याधिकारी,

मिरा-भाईन्दर नगर पालिका.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिकारी मिरा-भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिकारी मिरा-भाईंदर महानगरपालिका

O/C

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ 33/2018 दिनांक :- १८/3 /2018

प्रति,
**श्री. संपत तुळशिराम गायकवाड**
**रुम नं. 12, तिसरा मजला,**
**कमलकुंज अपार्टमेंट,**
**रॉलेक्स टिंबर मार्टच्या वर,**
**घाटकोपर (प.) मुंबई 400086.**

भारतीय डाक
EN040994455IN IVR:6977040994455
SP BHAYANDER WEST S.O (401101)
Counter No:6,19/04/2018,12:20
To:SAMPAT TULSHI,GHATKOPAR
PIN:400086, Ghatkopar West SO
From:MIRA BHAYANDER MAHANAGR,BHYN
Wt:10gms
Amt:17.70(Cash)Tax:2.70
(Track on www.indiapost.gov.in)

**विषय :-** **<u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.</u>**
**ठरावाच्या छायांकित प्रती मिळणे बाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 09/03/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये, आपण मा. स्थायी समिती सभा दि. 29/04/1995 ठराव क्र. 586 व मा. स्थायी समिती सभा दि. 15/09/1995 ठराव क्र. 630 (11) या ठरावाच्या सत्यप्रतींची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस मा. स्थायी समिती सभा दि. 29/04/1995 ठराव क्र. 586 ठरावाची सत्यप्रत सोबत जोडून देत आहोत. तसेच नगरसचिव विभागातील अभिलेख तपासला असता दि. 15/09/1995 रोजी स्थायी समिती सभेचे आयोजन केल्याची नोंद अभिलेखी दिसुन येत नाही. तथापी, दि. 16/09/1995 रोजी मा. स्थायी समिती सभेचे आयोजन केल्याची नोंद असुन उक्त सभेत ठराव क्र. 630 (11) पारित झालेला आहे. दि. 16/09/1995 ठराव क्र. 630 (11) ठरावाची सत्यप्रत सोबत जोडून देत आहोत.

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा प्र. नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल करता येईल.

कळावे.

१८/३/१८

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

दि. १८/०४/२०१८ रोजी
शिघ्र टपालाने पत्र पाठविण्यात
आले. १९/४/१८

pc 2\\User001\d\Mahiti Adhikar\Letter - Sampat Gayakwad.docx

# मिरा भाईंदर नगरपालिका परिषद

## मा. स्थायी समिती खास सभा दि. २९/०४/१९९५

**विषय क्र. २ :-** **मा. जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगीने अनधिकृत बांधकाम, नियंत्रण बांधकाम विभाग व पाणी पुरवठा वितरण व्यवस्था व दुरूस्ती साठी ६ अभियंता नेमणुक करणेबाबत.**

**ठराव क्र. ५८६ ची नक्कल प्रत :-**

नगरपालिकेचे कामकाज दिवसेंदिवस वाढत चालले असून पाणी पूरवठा सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच अतिक्रमणे दुर करणे करीता तांत्रिक कर्मचाऱ्यांची असलेली निकड लक्षांत घेता किमान ६ पदवीका धारक अभियंते शासन मांन्य दराने रोजंदारीवर मा. जिल्हाधिकारी सा़ो, ठाणे यांचे पुर्व मंजुरी घेउन पुढील व्यवस्था करणेंत यावी.

सुचक :- श्री. चौहान महेंद्र उदयराजसिंह

अनुमोदन :- श्री. थॉमस लॉ. डीसोझा

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
अध्यक्ष
स्थायी समिती
मिरा भाईंदर नगरपालिका परिषद

# मिरा भाईंदर नगरपालिका परिषद

## मा. स्थायी समिती सभा दि. १६/०९/१९९५

**ठराव क्र. ६३० (११) ची नक्कल प्रत :-**

नगरपालिका आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता नसल्यामुळे बरीच विकास कामे वेळेवर पूर्ण करुन घेता येत नाही. न.पा. कनिष्ठ अभियंत्यांची पदे मंजुरी करीता प्रस्ताव यापूर्वीच मा. आयुक्त सो. यांचेकडे पाठविला आहे. सदर प्रस्ताव प्रलंबित असल्याने कनिष्ठ अभियंत्यांची पदे न.पा.स. भरता येणार नाही. त्यामुळे न.पा.च्या विकास कामावर अनिष्ठ परिणाम होणार आहे. याकरीता न.पा. शासकीय मंजुरीने पदे भरता येत नसल्याने व ठेका पध्दतीने विशिष्ट अटी घालून कर्मचारी नेमता येत असल्याने दि. १८/०८/९५ रोजी दै. समाचार पत्रिका मध्ये कनिष्ठ अभियंता या पदाकरीता काम करणेस ठेका मागविला होता. त्यानुसार खालीलप्रमाणे अर्ज आलेले होते.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | अपेक्षीत मानधन |
|---|---|---|
| १ | श्री. दिपक भास्कर खांबित | रु. २,५००/- |
| २ | श्री. प्रशांत शांताराम पिंपळे | रु. ३,७००/- |
| ३ | श्री. रुपेश काशिनाथ पिंपळे | रु. २,५००/- |
| ४ | श्री. अतुल दत्तात्रेय मांजरेकर | रु. ३,५००/- |
| ५ | श्री. संतोष शिवराम | रु. २,५००/- |

वरील सर्व अर्ज पाहता खालील उमेदवारांकडे आवश्यक ती शैक्षणिक अर्हता असून ते त्यांच्या समोर दर्शविलेल्या मानधनावर काम करणेस तयार आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. रुपेश काशिनाथ पिंपळे | रु. २,५००/- |
| २ | श्री. दिपक भास्कर खांबित | रु. २,५००/- |
| ३ | श्री. संतोष शिवराम | रु. २,५००/- |

तरी वरील तिन्ही उमेदवारांनी प्रती महिना रु. २,५००/- एक वर्षाच्या मुदतीकरीता ठेकेपध्दतीवर न.पा.च्या सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये "कनिष्ठ अभियंता" या पदावर एक वर्षासाठी नियुक्ती करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. तुळशिदास म्हात्रे**
**अनुमोदन :- श्री. बाळकृष्ण तेंडूलकर**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**अध्यक्ष**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर नगरपालिका परिषद**